दि. २७/०२/२०१९

# जाहीर प्रकटन

पर्यावरण (रक्षण) कायदा १९८६, च्या कलम ५ अन्वये, पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कृत्रिमरित्या / प्लास्टिक पासून बनविलेल्या, “नायलॉन मांजा” या नावाने परिचित असलेल्या पक्क्या धाग्यामुळे होणाऱ्या प्राणघातक इजांपासून पक्षी व मानव जीवितांस संरक्षण करण्याची गरज आहे.

पतंगासह तुटलेल्या नायलॉन मांज्यांचे धागे लवकर विघटन होत नसल्याने गटारे व नदी – नाल्यासारख्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण करतात, तसेच गाय अथवा तत्सम प्राण्यांनी नायलॉन मांज्यांचे समाविष्ट असलेले खाद्य सेवन केल्यामुळे त्यांना गुदमरण्याचा त्रास होतो. अशा अपघटन न होऊ शकणाऱ्या प्लास्टिक धाग्यांच्या अति वापरामुळे विजेच्या तारांवरील घर्षणामुळे होणाऱ्या ठिणग्यांनी लागणाऱ्या आगीमुळे वीज प्रवाह खंडित होऊन व त्यामुळे वीज उपकरणांना बाधा पोहोचते, अपघात होतात, वन्यजिवांना धोका पोहचतो तसेच जीवित हानी होण्याचा संभव असतो.

महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार, पर्यावरण (रक्षण) कायदा १९८६, च्या कलम ५ अन्वये, नायलॉन मांजापासून होणारे धोके लक्षात घेता, अशा नायलॉन मांजाचे घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, साठवणूकदार तसेच विक्री व हाताळणीवर बंदी घालण्यात आली आहे.

तरी या जाहिर प्रकटनाद्वारे “नायलॉन मांजा” वर घालण्यात आलेल्या बंदीबाबत नागरिकांना, नायलॉन मांजाचे घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, साठवणूकदार तसेच विक्री व हाताळणी करणाऱ्यांना सूचित करण्यात येत आहे व या बंदीचे पालन न करणाऱ्यांवर पुणे महानगरपालिकेतर्फे कारवाई केली जाईल.

अति. महापालिका आयुक्त (विशेष)

पुणे महानगरपालिका